साप्ताहिक
# पुणेरी चळवळ
संपादक : सुनिल बालकिसन गोयल
मो. ९८६३६४६४६४
■ RNI No: MAHMAR/2020/87539
■ www.punerichalval.co.in

■ वर्षे 6 वे ■ अंक 29 ■ पुणे, गुरुवार 16 ते 22 जुलै 2026 ■ मुल्य : 2 रु ■ पान 4

■ Volum 6 ■ Issue : 29 ■ Pune, Thursday, 16 To 22 July 2026 ■ Price : 2 Rs/- ■ Pages : 4

## शेतकऱ्यांसाठी 48 हजार कोटींच्या थकीत कृषी वीजबिल माफीची घोषणा

**मुंबई** : महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 48 हजार कोटींच्या थकीत कृषी वीजबिल माफीची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांवरील थकीत वीजबिलाचा मोठा आर्थिक बोजा कमी होणार असून, कृषी क्षेत्राला दिलासा मिळणार आहे.



मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही घोषणा करताना सांगितले की, शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी आणि शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्यासाठी सरकारने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. वीजबिलाच्या थकबाकीमुळे अनेक शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे.या निर्णयानुसार कृषी वीज ग्राहकांच्या थकीत वीजबिलाची मोठी रक्कम माफ करण्यात येणार असून, पात्र शेतकऱ्यांना याचा थेट लाभ मिळेल. योजनेची अंमलबजावणी आणि पात्रतेचे निकष संबंधित विभागाकडून स्वतंत्रपणे जाहीर केले जाणार आहेत. राज्य सरकारच्या या निर्णयाचे विविध शेतकरी संघटना आणि कृषी क्षेत्रातून स्वागत करण्यात येत असून, शेतीसाठी आर्थिक स्थैर्य निर्माण करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

## मुळशीतील 250 विद्यार्थ्यांना कीर्तीशक्ती फाऊंडेशनकडून रेनकोट वाटप




**पुणे** : बाणेर येथील कीर्तीशक्ती फाऊंडेशनच्या वतीने मुळशी तालुक्यातील स्वामी विवेकानंद विद्यालयातील २५० गरजू विद्यार्थ्यांना मोफत रेनकोटचे वितरण करण्यात आले. मुसळधार पावसात विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती कायम राहावी, तसेच त्यांची पुस्तके व दप्तर सुरक्षित राहून शिक्षणात खंड पडू नये, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक सतीश शिंदे, वसतिगृह प्रमुख राठोड, विद्यार्थिनी वसतिगृह संचालिका स्वाती कदम, शिक्षकवृंद तसेच कीर्तीशक्ती फाऊंडेशनच्या डायरेक्टर कल्याणी टोकेकर, शिखा नीखरा आणिब्रिजेश राय उपस्थित होते.

## दस्तनोंदणीसाठी आधार बंधनकारक

### गैरव्यवहार रोखण्यासाठी मुद्रांक शुल्क विभागाचा निर्णय

**पुणे** : सदनिका वा कोणत्याही व्यवहाराची दस्तनोंदणी करताना दस्ताबरोबर आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव राज्याच्या नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने राज्य शासनाकडे पाठविला आहे. दस्तनोंदणीतील गैरप्रकार रोखण्यासाठी मुद्रांक शुल्क विभागाने हे पाऊल उचलले आहे.राज्यात मोकळ्या जागा, सदनिकांच्या दस्तनोंदणीचे लाखो व्यवहार दर वर्षी होतात. त्यातून राज्य शासनाला मोठ्या प्रमाणावर महसूलदेखील मिळतो. मात्र, दस्तनोंदणी करताना आतापर्यंत आधार कार्ड जोडणे बंधनकारक नव्हते. त्यामुळे खरेदीदार आणि विक्रेता यांची ओळख पटविण्यासाठी कोणताही ठोस पर्याय नव्हता. त्यातून बनावट आधार कार्ड जोडून फसवणूक होत होती. तसे काही प्रकारही उघडकीस आले होते. त्यामुळे नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने हा निर्णय घेतला आहे.




यापूर्वी आधार कार्ड जोडणे ऐच्छिक असल्यामुळे दुय्यम निबंधकांनाही दस्त नोंदवून घेताना 'स्किप'चा पर्याय वापरण्याचा अधिकार देण्यात आला होता. त्यामुळे शासकीय जमिनींचा गैरव्यवहार झाल्याची प्रकरणे पुढे आली. मुंढवा आणि ताथवडे येथील शासकीय जमिनींचा परस्पर खरेदी-विक्री व्यवहार झाल्यानंतर दस्तनोंदणी करताना आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. त्यानुसार नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने या बाबतचा प्रस्ताव राज्य शासनाला दिला आहे. राज्य शासनाच्या मंजुरीनंतर या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र रजिस्ट्रेशन ॲक्टमध्ये बदल करावा लागणार आहे. आधार कार्ड बंधनकारक झाल्यानंतर दस्तनोंदणी करताना आधार कार्डची पडताळणी करून खरेदीदार आणि विक्रेता या दोघांची ओळख पटविणे शक्य होणार आहे.

तसेच, दस्तनोंदणीच्या प्रणालीमध्ये देण्यात आलेला 'स्किप'चा पर्यायही बंद करण्यात येणार आहे. त्यामुळे दस्तनोंदणी करताना होणारे गैरप्रकार रोखण्यास मदत होणार असल्याचे नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाकडून सांगण्यात आले. दस्तनोंदणी करताना आधार कार्ड जोडणे बंधनकारक करण्याचा निर्णय नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने घेतला आहे. तसा प्रस्ताव राज्य सरकारला दिला आहे. सरकारच्या मान्यतेनंतर या प्रस्तावाची तातडीने अंमलबजावणी होईल. त्यामुळे दस्तनोंदणीतील गैरव्यवहार रोखणे शक्य होणार आहे.

## कचरा टाकण्यास मोशीतील नगरसेवकांचा विरोध

**पुणे** : मोशी येथील कचरा डेपोतील दुर्घटनेचे पडसाद पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत उमटले. या दुर्घटनेला भाजपसह सर्व पक्ष जबाबदार असल्याचा आरोप करून कचरा डेपोची क्षमता संपली असल्याने मोशीत आम्ही कचरा येऊ देणार नाही, अशी भूमिका मोशी परिसरातील नगरसेवकांनी घेतली. सभेत भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार), शिवसेना (शिंदे) पक्षाच्या नगरसेवकांमध्ये वादावादीचे प्रसंग घडले. या घटनेची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करून हा खटला जलदगती न्यायालयात चालवावा, अशी मागणी नगरसेवकांनी केली.



महापालिकेची जुलै महिन्याची सर्वसाधारण सभा बुधवारी झाली. अध्यक्षस्थानी महापौर रवी लांडगे होते. सभेच्या सुरुवातीलाच मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली वाहून कामकाजाला सुरुवात झाली. भाजपचे उत्तम केंदळे यांनी घटनेची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची मागणी केली. 'पुनावळेतील कचरा डेपोला विरोध करणारे भाजपसह सर्व राजकीय पक्ष मोशीतील घटनेला जबाबदार आहेत. तिन्ही विधानसभा मतदारसंघांत कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करावी,' असे सचिन तापकीर म्हणाले. 'गेल्या ३५ वर्षांपासून मोशीत कचरा आणून टाकला जात आहे. मोशीने शहराच्या कचऱ्याचा ठेका घेतला आहे का?' असा सवाल निखिल बोऱ्हाडे यांनी केला. पोलीस बंदोबस्त लावून पुनावळेत कचरा टाकावा. विकास आरखडा अंतिम करताना पुनावळेतील कचरा डेपोचे आरक्षण कायम ठेवण्याची मागणीही त्यांनी केली. 'मोशीत जनावरे राहत नसून माणसे राहतात', असे अर्चना सस्ते म्हणाल्या.

'ओला, सुका कचरा वेगळा का केला जात नाही. प्लास्टिक बंदी असतानाही डेपोवर प्लास्टिक का येते, एका रात्रीत कुदळवाडीत कारवाई केली जाते, मग मोशीतील डेपो का हटविला जात नाही, असा सवाल शिवसेनेच्या सुलभा उबाळे यांनी केला.अधिकाऱ्यांचे निलंबन करून चालणार नाही, तर त्यांना महापालिका सेवेतून बडतर्फ करावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे संदीप वाघेरे यांनी केली. शीतल शिंदे, तुषार हिंगे, विश्वजित बारणे, अपर्णा डोके, शर्मिला बाबर यांनीही चर्चेत भाग घेतला.

## तीर्थक्षेत्र रामदरा शिवालय मंदिर 1 सप्टेंबरपर्यंत दर्शनासाठी बंद

**पुणे** : लोणी काळभोर येथील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र रामदरा शिवालय मंदिरातील गर्भगृह व परिसरातील दुरुस्ती आणि डागडुजीच्या कामांमुळे १ सप्टेंबरपर्यंत भाविकांसाठी पूर्णपणे बंद राहणार आहे. कामाच्या गरजेनुसार या कालावधीत वाढ होण्याची शक्यता आहे. अशी माहिती तीर्थक्षेत्र रामदरा शिवालय ट्रस्टचे अध्यक्ष १००८ श्री महंत हेमंतपुरी महाराज यांनी दिली. तीर्थक्षेत्र रामदरा शिवालय मंदिराच्या गर्भगृहासह मंदिर परिसरामध्ये सध्या विविध आवश्यक दुरुस्ती व डागडुजीची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यामुळे १८ जून ते १८ जुलै दरम्यान भाविकांसाठी मंदिर बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र ठरवलेल्या या मुदतीत हे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे डागडुजीची उर्वरित कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यासाठी मंदिर प्रशासनाने मंदिर बंद ठेवण्याचा कालावधी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार आता १८ जून ते १ सप्टेंबर या कालावधीत मंदिर दर्शनासाठी बंद राहील. मंदिराच्या गर्भगृहात आणि इतर संवेदनशील भागांत बांधकाम व दुरुस्तीचे काम सुरू असल्याने भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

## यंदाच्या पुणे ग्रँड टूर स्पर्धेसाठी 130 किलोमीटरचे रस्ते होणार

**पुणे** : 'पुणे ग्रँड टूर आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धे'ची तयारी महापालिकेने सुरू केली आहे. या स्पर्धेसाठी यंदा शहरातील सुमारे १३० किलोमीटर रस्त्यांची दुरुस्ती आणि पुनर्डांबरीकरण केले जाणार आहे. यासाठी १६७ कोटी रुपयांच्या पूर्वगणनपत्रकाला महापालिकेच्या पूर्वगणन समितीने मान्यता दिली. या स्पर्धेसाठी आवश्यक असलेली कामे करण्यासाठी महापालिकेने चार टप्पे केले आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या पुढाकारातून झालेली ही स्पर्धा यंदा पुन्हा होणार आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील काही तालुक्यातील मार्ग निश्चित करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी सुमारे ७०० किलोमीटरहून अधिकच्या रस्त्यांची कामे केली जाणार आहेत. यामध्ये रस्त्यांची दुरुस्ती आणि पुनर्डांबरीकरण यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी या स्पर्धेनिमित्त ४५० किलोमीटर रस्त्यांची कामे करण्यात आली. याच पद्धतीने यंदाही रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे. त्यासाठी सुमारे १६७ कोटी रुपयांचा खर्च केला जाणार आहे. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रस्ते असणे आवश्यक आहे. यंदा पुणे शहरातील १३० किलोमीटर लांबीचा सायकल मार्ग दुरुस्त केला जाणार असून, रस्त्यांच्या पुनर्डांबरीकरणाची कामे केली जाणार आहेत. स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय मानकांनुसार रस्ते असणे आवश्यक आहे. त्यानुसार रस्त्यांची कामे दर्जेदार पद्धतीने व वेळेत पूर्ण व्हावीत आणि यासाठी एका ठेकेदाराकडे एकाच पॅकेजचे काम देण्यात येईल,असे महापालिकेच्या पथ विभागाचे प्रमुख राजेश बनकर यांनी सांगितले.



'यंदा सायकल स्पर्धेसाठी आवश्यक असलेले रस्ते तयार करण्याचे काम महापालिकेने सुरू केले आहे. मागील वर्षीप्रमाणेच नियम आणि अटी लागू असणार आहेत. कामाच्या गुणवत्तेत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेसाठी रस्त्यांचे निकष आहेत, ते पाळावेच लागणार असून, लवकरच कामाची निविदा काढली जाईल,' असे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले.

पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, सायकल स्पर्धेसाठी यंदाच्या वर्षी देखील आंतरराष्ट्रीय निकषांनुसारच रस्ते तयार केले जाणार आहेत.

# संपादकीय

## पाऊले चालती....

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी मध्यरात्री (भारतीय वेळेनुसार बुधवारी १२.३० वाजता) फ्रान्स आणि स्पेन या दोन युरोपियन खंडातील फुटबॉल महासत्तांमध्ये पहिला उपान्त्य सामना विलक्षण रंगला. आक्रमणावर भर देणारा फ्रान्स आणि भक्कम बचाव करणारा स्पेन यांच्यातील जुगलबंदीकडे सा-यांचे लक्ष लागले होते. यंदाच्या स्पर्धेत स्पेनने अवघा एक गोल खाल्ला आहे. यावरून त्यांचा भक्कम बचाव लक्षात येतो. एम्बाप्पे विरुद्ध उनाई सिमॉन, लॅमिन यमाल यांच्यातील द्वंद्व निर्णायक ठरणार होते. फिफा विश्वचषकाचा थरार गत महिनाभरापासून सुरू असून आता ही स्पर्धा उपान्त्य फेरीच्या टप्प्यावर आहे. फ्रान्स, मोरोक्को, स्पेन, बेल्जियम, इंग्लंड, नॉर्वे, अर्जेंटिना व स्विझर्लंड या आठ संघांनी उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता. त्यापैकी फ्रान्स, स्पेन, इंग्लंड व अर्जेंटिना या संघांनी आगेकूच केली, तर अन्य चार संघांची वाटचाल संपुष्टात आली. फ्रान्सने सलग तिस-यांदा विश्वचषकाची उपान्त्य फेरी गाठली आहे. १९९८ व २०१८ च्या विजेत्या फ्रान्सला २०२२ मध्ये अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. फ्रान्स हा सलग तीन विश्वचषकांत किमान उपान्त्य फेरी गाठणारा तिसरा देश ठरला. यापूर्वी ब्राझील व जर्मनीने अशी कामगिरी केली होती. रॉड्रीच्या नेतृत्वाखाली खेळणा-या स्पेनने यंदा साखळी फेरीत ह-गटातून अग्रस्थानासह आगेकूच करताना सौदी अरेबिया व उरुग्वे संघांना धूळ चारली तर केप व्हर्डेविरुद्ध बरोबरी पत्करली. त्यानंतर बाद फेरीत (राऊंड ऑफ ३२) ऑस्ट्रियाला ३-० असे पराभूत केले. उपउपान्त्यपूर्व लढतीत रोनाल्डोच्या पोर्तुगालचा स्वप्नभंग करताना १-० असा विजय मिळवला. या पाचही लढतींत स्पेनने एकही गोल स्वीकारला नव्हता. उपान्त्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्ध त्यांनी २-१ असा विजय मिळवला मात्र, गोल न खाण्याची मालिका खंडित झाली. स्पेनने २०१० नंतर प्रथमच उपान्त्य फेरी गाठली. स्पेनचा गोलरक्षक सिमॉनसह अन्य बचावपटूंना भेदण्यात बेल्जियम व्यतिरिक्त कोणालाही यश मिळाले नव्हते. त्यामुळे स्पेनच्या बचावफळीविरुद्ध फ्रान्सच्या आक्रमकांचा कस लागणार होता. मंगळवारी झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपान्त्य फेरीच्या सामन्यात स्पेनने जेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणा-या फ्रान्सचा २-० असा पराभव केला. या शानदार आणि नियंत्रित कामगिरीच्या जोरावर स्पेनने फिफा विश्वचषकाच्या फायनलमध्ये प्रवेश केला.सामन्याच्या सुरुवातीपासूनच स्पेनने चेंडूवर नियंत्रण ठेवले. मिकेल ओयाऱझाबाल याने मिळालेल्या पेनल्टीवर पहिला गोल करून स्पेनचे खाते उघडले. उत्तरार्धात पेड्रो पोरो याने दुसरा गोल करत संघाची आघाडी दुप्पट केली. एम्बाप्पे, उस्मान डेम्बेल, मायकल ओलीस ही फ्रान्सची आक्रमक फळी स्पेनच्या शिस्तबद्ध बचावासमोर पूर्णपणे हतबल ठरली. स्पेनला ऐतिहासिक विजय मिळवून देण्यात गोलकीपर उनाई सायमनचा अभेद्य बचाव आणि यंग सेन्सेशन १९ वर्षीय यमालचा खेळ कारणीभूत ठरला. सायमनने एम्बाप्पेचे धोकादायक हल्ले उधळून लावले तर तरुण खेळाडू यमालच्या पदलालित्यामुळे स्पेनला पहिली पेनल्टी मिळाली शिवाय त्याने आक्रमणासोबतच उत्कृष्ट बचावही केला. संपूर्ण स्पर्धेत स्पेनच्या बचावफळीने एकमेव गोल स्वीकारला आहे. अंतिम फेरीत दाखल होणारा स्पेन हा पहिला संघ ठरला आहे. अर्जेंटिना आणि इंग्लंड संघात उपान्त्य फेरीचा दुसरा सामना होणार आहे. बुधवारी मध्यरात्री (भारतीय वेळेनुसार गुरुवारी १२.३०) होणा-या या सामन्यात कोणता संघ बाजी मारतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. ॲटलांटा स्टेडियमवर रंगणा-या या लढतीत लिओनेल मेस्सी विरुद्ध हॅरी केनचे कडवे आव्हान असेल. गतविजेत्या अर्जेंटिनाने साखळीत सलग तीन विजय मिळवताना अल्जेरिया, ऑस्ट्रिया व जॉर्डन संघांना धूळ चारली होती. त्यानंतर राऊंड ऑफ ३२ मध्ये केप व्हर्डे आणि उपउपान्त्य फेरीत ईजिप्तविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला होता. उपान्त्यपूर्व सामन्यात अतिरिक्त वेळेत स्वित्झर्लंडवर ३-१ अशी मात केली होती. अर्जेंटिना गत काही सामन्यांत २ ते ३ गोल करत असला तरी १-२ गोलही खात आहे. म्हणजेच त्यांचा बचाव कमकुवत आहे. त्यामुळे इंग्लंडविरुद्ध अर्जेंटिनाच्या बचावफळीचा कस लागेल. अर्जेंटिनाने विश्वचषकातील सलग १२ सामन्यांत दोन किंवा त्याहून अधिक गोल केले आहेत. त्यांनी उरुग्वेचा ७४ वर्षांपूर्वीचा ११ सामन्यांचा विक्रम मोडला आहे. १९६६च्या विजेत्या इंग्लंडने साखळीत क्रोएशिया व पनामाला हरवले तर घानाविरुद्ध बरोबरी पत्करली. बाद फेरीत काँगोविरुद्ध २-१ तर मेक्सिकोविरुद्ध ३-२ असा विजय मिळवला. उपान्त्यपूर्व फेरीत नॉर्वेला २-१ असे नमवून चौथ्यांदा उपान्त्य फेरीत प्रवेश केला. अर्जेंटिनाने १९८६ मध्ये उपान्त्यपूर्व फेरीत दिएगो मॅराडोनाच्या 'हॅण्ड ऑफ गॉड' गोलद्वारे इंग्लंडला पराभूत केले होते. त्या पराभवाचे शल्य इंग्लंडच्या चाहत्यांच्या मनात आजही कायम असेल. आता इंग्लंड त्या पराभवाची सव्याज परतफेड करणार की अर्जेंटिना सलग दुस-यांदा अंतिम फेरीत धडक मारणार याची जगभरातील फुटबॉलप्रेमींना उत्सुकता आहे. इंग्लंडचा कर्णधार केनने यंदाच्या स्पर्धेत ६ गोल केले असून तो 'गोल्डन बूट'च्या शर्यतीत तिस-या क्रमांकावर आहे. इंग्लंडचा मध्यरक्षक बेलिंघमसुद्धा फॉर्मात येतोय. अर्जेंटिनाने सहाव्यांदा तर इंग्लंडने चौथ्यांदा विश्वचषक स्पर्धेची उपान्त्य फेरी गाठली आहे. विश्वविजेतेपद टिकवायचे अर्जेंटिनाचे स्वप्न आहे तर सहा दशकांनंतर पुन्हा विश्वचषक जिंकण्याची इंग्लंडची महत्त्वाकांक्षा आहे. अर्जेंटिना आणि इंग्लंडमध्ये विळ्या-भोपळ्याचे सख्य आहे.

# प्लास्टिक पिशव्या फेकून देता ७ भन्नाट टिप्स घर राहील स्वच्छ आणि नीट




जेव्हा आपण बाजारातून काही वस्तू विकत घेतो. तेव्हा अनेक दुकानदार त्या वस्तू प्लास्टिकच्या पिशवीतून देतात. हळूहळू, घरात अशा अनेक पिशव्या जमा होतात. निरुपयोगी म्हणून आपण त्या फेकून देतो. पण, या सगळ्या पिशव्या फेकून देण्याऐवजी, तुम्ही त्यांचा वेगवेगळ्या प्रकारे पुनर्वापर करू शकता. त्यांचा उपयोग रोजची कामे सोपी करण्यासाठी आणि प्रवासात वस्तू व्यवस्थित ठेवण्यासाठीही केला जाऊ शकतो.

**पायपुसणी**

तुमच्या सामानाबरोबर घरी आलेल्या प्लास्टिकच्या पिशव्यांचा तुम्ही हुशारीने पुनर्वापर करू शकता.

तुम्ही त्यांपासून एक जलरोधक पायपुसणी बनवू शकता, जी पावसाळ्यात चिखल, घाण आणि पावसाचे पाणी घरात येण्यापासून मोठ्या प्रमाणात रोखू शकते. हे करण्यासाठी, तुम्ही पिशव्या पातळ पट्ट्यांमध्ये कापून त्यांना शिवू शकता.

**बूट ठेवण्यासाठी**

बूट आणि चपला अनेकदा धूळ आणि घाणीने खराब होतात. म्हणून तुम्ही त्यांना स्वच्छ ठेवण्यासाठी प्लास्टिकच्या पिशवीचा वापर करू शकता. जर तुम्ही प्रवास करत असाल. तर तुम्ही त्यांना प्लास्टिकच्या पिशवीत सहजपणे ठेवू शकता. यामुळे पिशवीतील इतर वस्तू खराब होण्यापासून संरक्षण करता येईल. वस्तू ठेवण्यासाठी टोपल्या खूप उपयुक्त असतात. तुम्ही त्या घरी प्लास्टिकच्या पिशव्यांपासून बनवू शकता. अनेकदा घरात खूप प्लास्टिक जमा होते. ते फेकून देण्याऐवजी, तुम्ही त्याचा उपयोग टोपली बनवण्यासाठी करू शकता. यासाठी, एक पुठ्ठा किंवा खोका घ्या आणि प्लास्टिकच्या पिशव्या कापून त्यावर चिकटवा.

**प्रवास**

कधीकधी, प्रवासात कपडे धुण्यासाठी किंवा वाळवण्यासाठी तुमच्याकडे वेळ नसतो. अशा परिस्थितीत, तुम्ही ओले कपडे प्लास्टिकच्या पिशवीत ठेवू शकता. प्रवासात हे खूप उपयुक्त ठरू शकते. तुम्ही तुमचे घाणेरडे आणि स्वच्छ कपडे वेगळे ठेवू शकता, ज्यामुळे बाकीचे कपडे दुर्गंधी पासून सुरक्षित राहतात.

**फरशी स्वच्छ ठेवण्यासाठी**

फुलांच्या कुंड्या, लोखंडी टेबल, सिलिंडर किंवा इतर जड वस्तूंच्या खाली अनेकदा पाणी, धूळ किंवा गंज जमा होऊ शकतो. अशावेळी, तुम्ही प्लास्टिकची पिशवी दुमडून त्यांच्या खाली ठेवू शकता. यामुळे धूळ किंवा ओलावा थेट फरशीवर पोहोचण्यापासून रोखला जाईल आणि स्वच्छता करणेही सोपे होईल.

**कचरापेटीचे झाकण बनवा**

कचरा साठवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कचरापेट्या लवकर घाण होतात. प्लास्टिकची पिशवी झाकण म्हणून वापरल्याने कचरापेटी वारंवार स्वच्छ करण्याची गरज भासत नाही. शिवाय, साफसफाई करताना पिशवी काढल्याने कचरा वेगळा करणे सोपे होते.

**साठवणुकीसाठी वापरा**

घराची साफसफाई, रंगकाम किंवा दुरुस्ती करताना वस्तूंवर धूळ साचू शकते. लहान इलेक्ट्रॉनिक वस्तू, पुस्तके, खेळणी किंवा इतर वस्तू झाकण्यासाठी प्लास्टिकच्या पिशव्या वापरल्या जाऊ शकतात.

# पनीर आवडतं पण खाताच पोट टम्म फुगते गॅस होतो पण का पोटफुगीचे नक्की कारण काय

पनीर हा प्रथिने आणि कॅल्शियमचा एक उत्तम स्रोत मानला जातो. अनेक लोकांना पनीर प्रचंड आवडते पण काहींना ते खाल्ल्यानंतर पोटात जडपणा जाणवतो, गॅस आणि पोटफुगी होते. त्यामुळे ते पोटफुगी होण्याच्या भीतीने पनीर खाणेच बंद करतात. गॅस्ट्रोएंटेरोलॉजिस्ट आणि डायटिशियन कनिका मल्होत्रा यांच्या मते, पनीर हा प्रोटीनचा उत्तम स्रोत आहे. शाकाहारी लोक खास करून हे पदार्थ खाण्यास पसंती देतात. न्यूट्रिशन तज्ज्ञांच्यामते, पनीर खाल्ल्यास तुम्हाला पोटफुगी होत असेल तर समस्या पनीर नाही तर तुम्ही ते कशाबरोबर खाता आणि कधी खाता ही असू शकते.

सर्टिफाइड न्यूट्रिशनिस्ट आयना सिंघल यांच्यामते, पनीर जर जास्त कर्बोदके, गोड सॉस किंवा उशिरा पचण्यास जड जेवणाबरोबर खाल्ले तर त्यामुळे पचनासंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात. जसे की, पोटफुगी, पोटात जडपणा जाणवणे तर काहींना त्वचेसंबंधी समस्या निर्माण होऊ शकतात. आता प्रश्न असा आहे की कोणत्या पदार्थांबरोबर पनीर एकत्र खाल्ल्यास पोटफुगी किंवा गॅसची समस्या होते. तज्ज्ञांच्या मते पोटफुगी आणि गॅसपासून वाचण्यासाठी पनीरचे सेवन कसे करावे हे समजून घ्या.

काही पदार्थांबरोबर पनीरचे सेवन केल्याने खरंच पोटफुगी होते का? आयना सिंघल यांच्यामते, पनीरबरोबर काही पदार्थ खाल्ल्यास अन्न पचण्याचा वेग मंदावतो. म्हणून काही पदार्थांबरोबर पनीर खाणे टाळावे. तज्ज्ञांच्या मते, पनीरबरोबर एकावेळी चपाती किंवा भात दोन्हीपैकी एकच पर्याय निवडावा कारण एकाच वेळी भात-पोळीसह पनीर खाल्ले तर पोटफुगी होऊ शकते. पनीरबरोबर राजमा, छोले किंवा डाळींचे अधिक सेवन केल्यास पोटफुगी होते.

# एक महिना मेथीचे पाणी प्यायल्यास शरीरात दिसतील हे बदल

पावसाळ्यात आपली चयापचय क्रिया लक्षणीयरीत्या मंदावते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढण्याचा, वजन वाढण्याचा धोका वाढतो. आजकाल, रक्तातील साखर नियंत्रित करण्याचा एक नैसर्गिक उपाय म्हणून मेथीचे पाणी पिणे अधिकाधिक लोकप्रिय होत आहे. पण, हा घरगुती उपाय मधुमेहाच्या रुग्णांसाठी खरोखरच रामबाण उपाय आहे का, की त्याचे काही तोटे सुद्धा आहेत याचबद्दल आपण जाणून घेऊयात.

देशातील एक प्रसिद्ध आरोग्य आणि योग तज्ज्ञ हंसा योगेंद्र, पावसाळ्यात मेथीच्या दाण्याचे पाणी पिण्याची शिफारस करतात. आयुर्वेदिक दृष्टिकोनातून मेथीचे पाणी वात व कफ दोषांना संतुलित करते. त्याचे दुग्धवर्धक, दाहशामक गुणधर्म सूज, लठ्ठपणा, रक्तातील साखर, हृदयाशी संबंधित समस्या कमी करण्यास मदत करतात.




जर महिनाभर सतत मेथीचे पाणी प्यायले. तर त्याचे अनेक आरोग्यदायी फायदे होतील. चला, महिनाभर मेथीचे पाणी पिण्याचे फायदे, तोटे जाणून घ्या.

**मेथीचे पाणी कसे बनवाव**

१ चमचा मेथीचे दाणे एका ग्लास पाण्यात रात्रभर भिजवून ठेवा. सकाळी पाणी गाळून घ्या आणि रिकाम्या पोटी प्या. गरज वाटल्यास तुम्ही भिजवलेल्या बिया चावूनही खाऊ शकता. कमी प्रमाणात सुरुवात करा आणि जर तुम्हाला कोणत्याही प्रकारची ॲलर्जी, रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होणे किंवा इतर कोणतीही आरोग्य समस्या असेल, तर आधी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**रक्तातील साखर**

मेथीमध्ये गोड रस व जड मल-विरोधी गुणधर्म भरपूर प्रमाणात असतात, जे मधुमेहाशी संबंधित पित्त व कफ यांचे संतुलन शांत करतात. मेथीचे दाणे औषधी गुणधर्मांनी समृद्ध असा एक मसाला आहे, ज्यामध्ये विद्राव्य फायबर व अमिनो ॲसिड असतात, जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. मेथीच्या दाण्यांमध्ये आढळणारे गॅलॅक्टोमॅनन नावाचे फायबर, अन्नातून ग्लुकोजचे शोषण मंदावू शकते. नियमितपणे कमी प्रमाणात मेथीचे सेवन केल्याने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास, रक्तातील साखरेतील चढ-उतार कमी करण्यास मदत होऊ शकते. पण, मधुमेहींनी याला औषधांचा पर्याय समजू नये आणि केवळ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच त्याचे सेवन करावे.

**चयापचय**

मेथीचे पाणी पाचक एन्झाइम्सचे कार्य सुधारण्यास मदत करू शकते, ज्यामुळे शरीर अन्न अधिक प्रभावीपणे पचवू शकते. काही संशोधनानुसार, मेथीमधील सक्रिय घटक ऊर्जेचा वापर, चरबीच्या चयापचय क्रियेस मदत करू शकतात. पण, याचा परिणाम हळूहळू दिसून येतो आणि केवळ मेथीच्या पाण्याने वजन कमी होण्याची अपेक्षा करणे योग्य नाही.

**पचनसंस्था**

मेथीच्या दाण्यांमध्ये फायबर भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे शौचास नरम होण्यास आणि शौचाची क्रिया नियमित राहण्यास मदत होते. सकाळी रिकाम्या पोटी मेथीचे पाणी प्यायल्याने काही लोकांना गॅस, अपचन, सौम्य बद्धकोष्ठतेपासून आराम मिळू शकतो. पचनाच्या समस्या दीर्घकाळ टिकून राहिल्यास, डॉक्टरांचा सल्ला घेणे महत्त्वाचे आहे.

Marathi News paper 'Puneri Chalval' Editor ,Owner Sunil Balkisan Goyal Printed at Shree Samarth Printers, 483, Roshani Palace, Shop No 8, Shaniwar Peth, Dist - Pune - 411030 and Published by Varun Sunil Goyal from S. No-155,HussinShah Baba Nagar vishrantwadi Pune 411006 Editor -Sunil Balkisan Goyal

पुणेरी चळवळ हे मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक - सुनिल बालकिसन गोयल एवं प्रकाशक - वरुण सुनिल गोयलने श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस, शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) मुद्रीत कर शहर कार्यालय सं.नं.१५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया के बाजुमें येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) यहाँ प्रकाशित किया. संपादक- सुनिल बालकिसन गोयल

पुणेरी चळवळ मराठी साप्ताहिक मुद्रक, मालक, संपादक- सुनिल बालकिसन गोयल तसेच प्रकाशक - वरुण सुनिल गोयल यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, ४०३ रोशनी पॅलेस , शॉप नं ८, शनिवार पेठ, जिल्हा-पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापुन शहर कार्यालय सं. नं. १५५, हुसेनशाह बाबानगर, प्रतिकनगर कार्यालया शेजारी येरवडा पुणे - ४११००६ ( महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक- सुनिल बालकिसन गोयल

अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या, लेख, व जाहीरात यांच्याशी मालक, संपादक सहमत असतीलच असे नाही. सदरचा वाद-विवाद पुणे न्यायलयाच्या कक्षेत

# पुणे मेट्रोच्या नावाखाली मोठा जॉब स्कॅम



**पुणे** : पुणे मेट्रोमध्ये नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवत बनावट भरती जाहिराती आणि खोट्या नियुक्तीपत्रांच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांची फसवणूक होत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर महामेट्रोने नागरिक आणि नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

महामेट्रोच्या नावाचा आणि अधिकृत लोगोचा गैरवापर करून सोशल मीडिया, बनावट वेबसाइट्स आणि मेसेजिंग प्लॅटफॉर्मवर खोट्या भरतीच्या जाहिराती प्रसारित केल्या जात आहेत. काही प्रकरणांमध्ये उमेदवारांकडून नोंदणी शुल्क किंवा इतर कारणांनी पैसेही उकळले जात असल्याची माहिती समोर आली आहे. महामेट्रोने स्पष्ट केले आहे की, भरती प्रक्रिया पूर्णपणे गुणवत्ता आणि पात्रतेच्या आधारे केली जाते. कोणत्याही खासगी एजन्सी किंवा प्रशिक्षण संस्थेमार्फत भरती केली जात नाही. सर्व अधिकृत भरतीच्या जाहिराती केवळ महामेट्रोच्या अधिकृत संकेतस्थळावर आणि अधिकृत सोशल मीडिया हँडल्सवरच प्रसिद्ध केल्या जातात.

संशयास्पद जाहिराती, बनावट नियुक्तीपत्रे किंवा पैशांची मागणी करणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहण्याचे आवाहन महामेट्रोने केले आहे.

# पीएमआरडीए च्या रखडलेल्या विकासाला मिळणार गती

## पुणे महानगर क्षेत्रात यूडीसीपीआर अखेर लागू

**पुणे** : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) संपूर्ण कार्यक्षेत्रात तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) विशेष नियोजन क्षेत्रात अखेर एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (यूडीसीपीआर) लागू करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४(१) मधील तरतुदीनुसार हे आदेश जारी केले असून, ते तातडीने अंमलात आले आहेत. या निर्णयामुळे 'पीएमआरडीए' क्षेत्रातील रखडलेल्या विकासाला गती मिळणार असून, इतर नियोजन प्राधिकरणांप्रमाणेच येथेही सुसंगत आणि नियोजनबद्ध विकासाला चालना मिळणार आहे.




### जुनी नियमावली बदलली नव्या युगाची सुरुवात

'पीएमआरडीए'ने २ ऑगस्ट २०२१ रोजी पुणे महानगर प्रदेशासाठी प्रारूप विकास योजना (ड्राफ्ट डीपी) जाहीर केली होती. मात्र, २७ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेद्वारे प्राधिकरणाने कलम २३, २६ आणि २८ अंतर्गतची सर्व कार्यवाही रद्द करून ही प्रक्रिया पूर्णपणे मागे घेतली होती. तोपर्यंत या भागात २०१८ मधील विकास नियंत्रण नियमावली लागू होती. राज्यातील इतर महापालिका आणि लगतच्या नियोजन प्राधिकरणांमध्ये 'यूडीसीपीआर' लागू असल्याने, 'पीएमआरडीए' क्षेत्रातही तो लागू करावा, असा ठराव प्राधिकरणाच्या १२व्या सभेत मुख्यमंत्री आणि 'पीएमआरडीए'चे अध्यक्ष देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंजूर करण्यात आला होता. 'पीएमआरडीए'ने ८ एप्रिल २०२५ रोजी शासनाकडे केलेल्या विनंतीचा विचार करून राज्य शासनाने जनहिताच्या दृष्टीने अखेर हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे.

### 'एमएसआरडीसी'च्या 668 चौ.कि.मी. क्षेत्राचाही समावेश

राज्य शासनाने १० ऑक्टोबर २०२४ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पुणे महानगर प्रदेशातील रिंग रोड (बाह्य वळण मार्ग) आणि त्यालगतच्या दोन ग्रोथ सेंटर्सच्या विकासासाठी ६६८ चौरस किलोमीटर क्षेत्र तसेच ११७ गावांसाठी 'एमएसआरडीसी'ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केली आहे. शासनाच्या नव्या आदेशानुसार, 'पीएमआरडीए'च्या मुख्य क्षेत्रासोबतच 'एमएसआरडीसी'च्या अखत्यारीतील या ६६८ चौरस किलोमीटर क्षेत्रातही राज्यात ३ डिसेंबर २०२० पासून लागू असलेली 'यूडीसीपीआर' नियमावली लागू होणार आहे. तसेच, ही गावे भविष्यात 'पीएमआरडीए'मध्ये समाविष्ट होणार असल्याने त्यांनाही ही नियमावली लागू राहणार आहे. नगरविकास विभागाचे उपसचिव प्रणव कर्पे यांच्या स्वाक्षरीने हे आदेश जारी करण्यात आले आहेत.

# मोईत PMRDA ची विक्रमी धडक

**पुणे** : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण ने मोई परिसरात अनधिकृत बांधकामांविरोधात आतापर्यंतची सर्वात मोठी कारवाई करत दोन दिवसांत तब्बल 680 अनधिकृत पत्राशेड (टिन शेड) जमीनदोस्त केले. या मोहिमेमुळे सुमारे 35 हेक्टर सरकारी व नियोजित विकास क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्यात आले.



PMRDA च्या अतिक्रमण निर्मूलन पथकाने महसूल विभाग, पोलिस प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणांच्या मदतीने ही कारवाई केली. गेल्या काही महिन्यांपासून मोई परिसरात उभारण्यात आलेल्या अनधिकृत पत्राशेड आणि बेकायदेशीर बांधकामांमुळे नियोजित विकासकामांमध्ये अडथळे निर्माण होत होते. त्यानंतर संबंधितांना नोटिसा बजावून ही धडक कारवाई करण्यात आली.

या मोहिमेसाठी मोठ्या प्रमाणात मनुष्यबळ, जेसीबी, पोकलेन यंत्रे आणि इतर यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. कारवाईदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

PMRDA प्रशासनाने स्पष्ट केले की, महानगर प्रदेशातील अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरोधातील मोहीम पुढेही सुरू राहणार असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल.

नागरिकांनी अधिकृत परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करू नये, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे.

या विक्रमी कारवाईमुळे मोई परिसरातील मोठा भूभाग अतिक्रमणमुक्त झाला असून भविष्यातील नियोजित विकास प्रकल्पांना गती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# लाडकी बहीण योजनेतून 38% महिलांना वगळल्याचा काँग्रेसचा आरोप

**मुंबई** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील सुमारे 38 टक्के महिला लाभार्थ्यांना ई-केवायसी (e-KYC) प्रक्रियेनंतर वगळण्यात आल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. या निर्णयामुळे लाखो महिलांना योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचा दावा करत काँग्रेसने राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे.




काँग्रेसचे प्रवक्ते अतुल लोंढे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, ई-केवायसीच्या नावाखाली सुमारे 62 लाख महिलांची नावे लाभार्थी यादीतून वगळण्यात आली, ज्यामुळे एकूण लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली. त्यांच्या मते, ही कारवाई निवडणुकीनंतर करण्यात आली असून सरकारने महिलांची फसवणूक केली आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करत सांगितले की, ई-केवायसी आणि पात्रता पडताळणीदरम्यान अपात्र लाभार्थी, उत्पन्न मर्यादा ओलांडणारे अर्जदार, सरकारी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सदस्य तसेच इतर निकषांमध्ये न बसणाऱ्यांची नावे वगळण्यात आली. सरकारच्या म्हणण्यानुसार ही प्रक्रिया योजनेचा लाभ केवळ पात्र महिलांपर्यंत पोहोचावा यासाठी राबविण्यात आली.

# पुण्यात 19 जुलैला इस्कॉनची भव्य श्री श्री जगन्नाथ रथयात्रा

**पुणे** : जगन्नाथ पुरी येथे साजऱ्या होणाऱ्या रथयात्रा उत्सवाप्रमाणे आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघ – इस्कॉन, पुणे यांच्यातर्फे आयोजित जगन्नाथ रथयात्रा सोहळ्याला रविवार, दिनांक १९ जुलै रोजी दुपारी १ वाजता टिळक रस्त्यावरील स.प.महाविद्यालय येथून प्रारंभ होणार आहे. ओडिसामधील जगन्नाथ पुरी येथे रथयात्रा मोठया उत्साहात साजरी होते. त्याच पार्श्वभूमीवर पुण्यामध्ये रथयात्रा होणार आहे. रथयात्रेच्या दिवशी इस्कॉन कात्रज-कोंढवा रस्ता, पुणे मंदिरातील भगवान जगन्नाथ, बलराम आणि सुभद्रा यांना खास दर्शनासाठी रथावर आणले जाते, अशी माहिती इस्कॉन मंदिराचे प्रवक्ते जनार्दन चितोडे यांनी पत्रकार परिषदेत दिली.



पत्रकार परिषदेला इस्कॉन मंदिराचे जनसंपर्क प्रमुख प्रसाद कारखानीस, स्वागत प्रमुख राधिका विनोद प्रभू, सौम्य निताई प्रभू, ॲड. अभिजित साकुरकर, सहस्त्र तीर्थ प्रभू, अमर सोनवणे असे उपस्थित होते.

रथयात्रेचे उद्घाटन इस्कॉन संस्थेचे संन्यासी प.पू. लोकनाथ स्वामी, इस्कॉन मंदिराचे अध्यक्ष राधेश्याम प्रभू, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार मेधा कुलकर्णी, उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार हेमंत रासने, सुनील कांबळे, योगेश टिळेकर यांच्यासह पुणे शहरातील सर्व आमदार, नगरसेवक, पुणे महापालिकेतील पदाधिकारी तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते दुपारी १२ वाजता स.प. महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे, असे मंदिराचे उपाध्यक्ष संजय भोसले यांनी सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते भगवान जगन्नाथ, बलदेव आणि सुभद्रा यांची आरती झाल्यानंतर १ वाजता रथयात्रेला प्रारंभ होईल. स.प.महाविद्यालय, अभिनव महाविद्यालय चौक, बाजीराव रस्ता, शनिपार चौक, नगरकर तालीम चौक, लक्ष्मी रस्ता, शगुन चौक, रमणबाग शाळा, ओंकारेश्वर मंदिर, बालगंधर्व रंगमंदिर, जंगली महाराज रस्ता, खंडुजीबाबा चौक, टिळक चौक, टिळक रस्ता मार्गे स.प.महाविद्यालय येथे रथयात्रेचा समारोप होणार आहे. ठिकठिकाणी या रथयात्रेचे स्वागत मोठया उत्साहात होणार असून यामध्ये अनेक संन्यासी व महापुरुष सहभागी होणार आहेत. सायंकाळी ७ वाजता आरती, दर्शन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

रथयात्रेतील रथाची उंची २० फूट इतकी असून फुलांसह रंगीबेरंगी कापडांनी रथावर सजावट केली जाणार आहे. हा रथ इस्कॉनचे पदाधिकारी आणि सर्व भाविक ओढणार आहेत.

# पुणे पोलिस दलात 35% अधिकारी पदे रिक्त

**पुणे** : पुणे शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार, वाढती लोकसंख्या आणि बदलते गुन्हेगारी स्वरूप लक्षात घेऊन शहरात १२ नवीन पोलिस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली असून, आणखी ४० नवीन पोलिस चौक्या सुरू करण्याचे नियोजन आहे. मात्र, पोलिस दलातील अधिकारी वर्गातील मोठ्या प्रमाणावरील रिक्त पदांमुळे या विस्ताराची प्रभावी अंमलबजावणी कशी होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सध्या पुणे पोलिस आयुक्तालयात मंजूर अधिकारी पदांपैकी सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असून, त्यामध्ये पोलिस उपनिरीक्षक (PSI) पदांच्या तब्बल २११ जागा रिक्त आहेत.

सध्या पुणे शहरात ४५ पोलिस ठाणे आणि ११० पोलिस चौक्या कार्यरत आहेत. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत किमान तीन चौक्या असाव्यात या उद्देशाने २३ ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात ४० नवीन चौक्या सुरू करण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. मात्र, नवीन पोलिस ठाणे प्रभावीपणे चालविण्यासाठी आवश्यक अधिकारी उपलब्ध नसल्याने या योजनेसमोर मनुष्यबळाचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. पोलिस निरीक्षक, सहाय्यक पोलिस निरीक्षक आणि उपनिरीक्षक या सर्व संवर्गांमध्ये मोठ्या प्रमाणावर रिक्त पदे असल्याने विद्यमान अधिकाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. कायदा-सुव्यवस्था, गुन्ह्यांचा तपास, वाहतूक नियोजन, बंदोबस्त, न्यायालयीन कामकाज आणि प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळताना अधिकारीवर्गावर आधीच ताण आहे.

# टाटा मोटर्स फाउंडेशनकडून महाराष्ट्रातील ४५ लाख नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल

## जलसंधारण ग्रामीण विकास व पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना

**पुणे** : मानवी जीवनचक्राकार आधारित सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून टाटा मोटर्स फाउंडेशनने गेल्या दशकभरात महाराष्ट्रातील जवळपास ४५ लाख नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणल्याचा दावा करण्यात आला आहे. आरोग्य, शिक्षण, रोजगारक्षमता, पर्यावरण, ग्रामीण विकास आणि जलसंधारण या क्षेत्रांमध्ये राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांद्वारे राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये व्यापक सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यात आल्याची माहिती पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली.

'मोअर फ्रॉम लेस फॉर मोअर' या तत्त्वावर काम करणाऱ्या टाटा



मोटर्स फाउंडेशनने राज्य शासन, स्थानिक प्रशासन, नाम फाउंडेशन तसेच विविध समविचारी संस्था व प्रतिष्ठानांच्या सहकार्याने सामाजिक-आर्थिक आव्हानांवर मात करण्यासाठी अनेक नाविन्यपूर्ण प्रकल्प राबविले आहेत. संसाधनांचा प्रभावी वापर, सरकारी योजनांचा समन्वय आणि समुदायाचा सक्रिय सहभाग या त्रिसूत्रीवर हे उपक्रम आधारित आहेत.

### 26 जिल्ह्यांमध्ये जलसंधारणाची मोठी मोहीम

जलसंधारण हा टाटा मोटर्स फाउंडेशनचा महाराष्ट्रातील सर्वात मोठा सामुदायिक उपक्रम ठरला आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' योजनेअंतर्गत फाउंडेशनने राज्यातील २६ जिल्ह्यांमध्ये २,५०० जलस्रोतांचे पुनरुज्जीवन केले आहे. महाराष्ट्र शासन आणि नाम फाउंडेशनच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमातून ४,००० कोटी लिटरपेक्षा अधिक अतिरिक्त पाणी साठवण क्षमता निर्माण झाली असून, त्याचा लाभ २० लाखांहून अधिक नागरिकांना झाला आहे.

### ग्रामीण विकासासाठी आयव्हीडीपीची प्रभावी अंमलबजावणी

इंटिग्रेटेड व्हिलेज डेव्हलपमेंट प्रोग्राम (आयव्हीडीपी) अंतर्गत ग्रामीण भागातील आरोग्य, शिक्षण, उपजीविका, स्थानिक प्रशासन आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापनावर भर देण्यात आला आहे. पालघर जिल्ह्यात सुरू झालेला हा उपक्रम आता पुणे जिल्ह्यातील पांचाळे आणि कुशिन ग्रामपंचायतींमध्येही राबविण्यात आला आहे.

या प्रकल्पामुळे आदिवासी पाड्यांमधील ७,००० हून अधिक नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा झाली असून, कुटुंबांच्या सरासरी उत्पन्नात ३० टक्क्यांची वाढ झाली आहे. डिजिटल सेवा केंद्रांच्या माध्यमातून डिजिटल दरी कमी करण्यात आली असून, विविध शासकीय योजनांचा लाभ अधिक प्रभावीपणे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला आहे.

### आयव्हीडीपी 2.0 ची राज्यभर अंमलबजावणी

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये टाटा मोटर्स फाउंडेशनने महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार करून आयव्हीडीपी २.० ची सुरुवात केली आहे. सध्या ८२ ग्रामपंचायतींमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावरील प्रशासन अधिक सक्षम करणे, नियोजन प्रक्रियेला संस्थात्मक स्वरूप देणे, सेवा वितरण अधिक प्रभावी करणे आणि पात्र नागरिकांपर्यंत शंभर टक्के शासकीय योजनांचा लाभ पोहोचविणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

# महाराष्ट्रात कागदी रेशन कार्डला रामराम

## आता मिळणार QR कोडयुक्त स्मार्ट रेशन कार्ड

**मुंबई** : राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेत मोठा बदल करत महाराष्ट्र सरकारने पारंपरिक कागदी रेशन कार्डांच्या जागी QR कोडयुक्त स्मार्ट रेशन कार्ड सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या व्यवस्थेमुळे रेशन वितरण अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून बनावट लाभार्थींना आळा बसण्यास मदत होईल. स्मार्ट रेशन कार्डमध्ये लाभार्थ्यांची माहिती डिजिटल स्वरूपात उपलब्ध असेल. QR कोड स्कॅन करून रेशन दुकानांवर लाभार्थ्यांची



पडताळणी करता येणार असून, त्यामुळे रेशन वितरणाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक होईल. तसेच बनावट कार्ड, डुप्लिकेट नोंदी आणि गैरव्यवहार रोखण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्य सरकारने या योजनेसाठी सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून, नवीन स्मार्ट रेशन कार्डांचे वितरण टप्प्याटप्प्याने राज्यभर सुरू करण्यात येणार आहे. लाभार्थ्यांना आवश्यकतेनुसार आधार लिंकिंग आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

स्मार्ट रेशन कार्ड प्रणालीमुळे लाभार्थ्यांची ओळख पटविणे, रेशन वितरणाचे डिजिटल रेकॉर्ड ठेवणे आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पारदर्शकता वाढविणे शक्य होणार आहे. याशिवाय, 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासही या प्रणालीचा फायदा होईल.

# पुणेकरांना गढूळ पाण्याचा पुरवठा

**पुणे** : शहरातील अनेक भागांमध्ये गेल्या काही दिवसांपासून गढूळ आणि पिवळसर पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे कच्च्या पाण्याची गढूळता मोठ्या प्रमाणात वाढली असून त्याचा परिणाम जलशुद्धीकरण प्रक्रियेवर होत आहे. त्यामुळे काही भागांत पूर्णपणे स्वच्छ पाणीपुरवठा करणे सध्या आव्हानात्मक ठरत असल्याचे पुणे महानगरपालिकेने स्पष्ट केले आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागानुसार, विशेषतः पर्वती जलशुद्धीकरण केंद्रावर येणाऱ्या कच्च्या पाण्याची गढूळता प्रकल्पाच्या क्षमतेपेक्षा अधिक वाढली आहे. आवश्यक प्रक्रिया सुरू असली तरी काही भागांमध्ये पाण्याचा रंग आणि गुणवत्ता प्रभावित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नळाचे पाणी थेट न पिता ते उकळून किंवा योग्य प्रकारे फिल्टर करूनच वापरावे, असे आवाहन महापालिकेने केले आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि आजारी व्यक्तींनी अधिक काळजी घेण्याचा सल्लाही देण्यात आला आहे. दरम्यान, महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी शहरातील विविध भागांतील पाणीपुरवठ्यावर सातत्याने लक्ष ठेवले असून, आवश्यक त्या ठिकाणी पाइपलाइन आणि जलशुद्धीकरण व्यवस्थेची तपासणी सुरू असल्याचे सांगितले आहे.

# पुण्यात बनावट मीठ आणि औषधांचा काळाबाजार उघड

**पुणे** : पुण्यात बनावट मीठ आणि बनावट औषधांच्या विक्रीची दोन स्वतंत्र प्रकरणे उघडकीस आली असून, फुरसुंगी आणि नऱ्हे पोलिसांनी संबंधितांविरुद्ध गुन्हे दाखल केले आहेत. नामांकित कंपनीच्या नावाचा गैरवापर करून बनावट मीठ विक्रीचा प्रकार उघडकीस आला असून, दुसरीकडे बनावट औषधांच्या गोळ्यांची विक्री केल्याप्रकरणी औषध विक्रेत्यासह आठ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

### नामांकित कंपनीच्या नावाने बनावट मीठाची विक्री

हडपसर-फुरसुंगी परिसरातील एका गोदामात नामांकित मीठ उत्पादक कंपनीच्या नावाने बनावट मीठाच्या पुड्यांचा साठा करून विक्री केली जात असल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी फुरसुंगी पोलिसांनी मार्केट यार्डातील एका व्यापाऱ्याविरुद्ध कॉपीराइट कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संबंधित कंपनीच्या वतीने काम पाहणारे कृष्णा देवीप्रसाद



कनोजिया (वय ५०, कुरार व्हिलेज, मालाड, मुंबई) यांनी फिर्याद दिली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हडपसर-सासवड मार्गावरील फुरसुंगी येथील आरंभ डिस्ट्रीब्युटर्स या गोदामात बनावट मीठाचा साठा असल्याची माहिती मिळाल्यानंतर फुरसुंगी पोलिसांनी छापा टाकला. त्यानंतर मार्केट यार्डातील एका व्यापाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक एस. माने पुढील तपास करीत आहेत.

### बनावट औषध विक्रीप्रकरणी आठ जणांवर गुन्हा

दुसऱ्या कारवाईत, सिंहगड रस्त्यावरील वडगाव बुद्रुक परिसरातील एका औषध विक्री दुकानातून बनावट औषधांच्या गोळ्यांची विक्री होत असल्याचा प्रकार अन्न व औषध प्रशासन (एफडीए) विभागाने उघडकीस आणला आहे. एफडीएच्या निरीक्षक श्रुतिका जाधव यांनी नऱ्हे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, सात्विक फार्मा शॉप या औषध विक्री दुकानाच्या मालकासह आठ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सिक्कीमस्थित सन फार्मा लॅबोरेटरीज या कंपनीच्या नावाने तयार करण्यात येणाऱ्या लेबीपील या औषधाच्या बनावट गोळ्यांची विक्री करण्यात येत असल्याचे एफडीएच्या तपासात समोर आले. या प्रकरणाचा तपास सहायक पोलीस निरीक्षक एन. पाटील करीत आहेत.

# MPSC ऑनलाइन परीक्षेला काँग्रेसचा विरोध

## विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळू नका गोपाळदादा तिवारींचा इशारा




**पुणे** : महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्याच्या निर्णयावर काँग्रेसने तीव्र आक्षेप घेतला आहे. एमपीएससीची परीक्षा पूर्वीप्रमाणे ऑफलाइन पद्धतीनेच घ्यावी, या विद्यार्थ्यांच्या मागणीला काँग्रेसचा पूर्ण पाठिंबा असल्याचे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी स्पष्ट केले.

पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत तिवारी म्हणाले की, लाखो विद्यार्थी एमपीएससी परीक्षेची अनेक वर्षे तयारी करतात. अशा परिस्थितीत अचानक ऑनलाइन परीक्षा घेण्याचा निर्णय विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणारा आहे. परीक्षा पद्धतीत मोठा बदल करताना विद्यार्थ्यांना पुरेसा कालावधी देणे आवश्यक होते, असेही त्यांनी सांगितले. तिवारी यांनी ऑनलाइन परीक्षेतील नॉर्मलायझेशन पद्धती, विविध शिफ्टमध्ये होणाऱ्या परीक्षा आणि खाजगी कंपन्यांच्या सहभागावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. ऑनलाइन परीक्षा घेताना पेपरफुटी आणि तांत्रिक अडचणींचा धोका वाढू शकतो, त्यामुळे आयोगाने विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. काँग्रेसने आरोप केला की, आंदोलनाची भूमिका घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर दबाव आणण्याचे आणि त्यांची बदनामी करण्याचे प्रयत्न होत आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या संविधानिक अधिकारांपासून वंचित ठेवू नये, असेही तिवारी यांनी नमूद केले.

यावेळी एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष साहेबराव क्षीरसागर यांनी सांगितले की, राज्यातील दीड लाखांहून अधिक विद्यार्थी एमपीएससी परीक्षा देणार आहेत. ऑनलाइन परीक्षेमुळे अतिरिक्त शुल्क, तांत्रिक अडचणी आणि आर्थिक भार वाढण्याची शक्यता आहे. एमपीएससी परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी सचिन गायकवाड यांनीही ऑनलाइन परीक्षेचा निर्णय अवघ्या एका महिन्याच्या पूर्वसूचनेवर घेण्यात आल्याचा आक्षेप नोंदवला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांकडे संगणक आणि इंटरनेट सुविधांचा अभाव असल्याने त्यांचे नुकसान होईल, असे त्यांनी सांगितले. काँग्रेसने इशारा दिला आहे की, आयोगाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांचा विचार केला नाही, तर पक्ष विद्यार्थ्यांसोबत तीव्र आंदोलन उभारेल.